# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१६/3463

दिनांक :- - 9 NOV 2016

प्रति,

**प्राचार्य,**

विनाअनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र, पदविका व पदवी

तसेच विनाअनुदानित एम.बी.ए./एमसीए पदव्युत्तर पदवी संस्था.

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती योजनेबाबत सबंधित संस्थेनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक माहिती (Qualification Details) अद्यावत करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १) उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र:- टीईएम २०१५/प्र.क्र.२१९/तांशि ४ दि. ३१/३/२०१६.

२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/शिष्यवृत्ती/२०१६/२९८२ दिनांक ८/०९/२०१६.

३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१६/३३७८ दिनांक २६/१०/२०१६.

उपरोक्त संदर्भिय विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपण शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती मिळण्याकरीता ई.बी.सी. अर्ज सबंधित जिल्हयातील शासकीय संस्थेकडुन तपासणी अधिकारी यांचेकडुन शासन निर्णय क्रमांक टीईएम/प्र.क्र.२१९/तांशि ४ दिनांक ३१ मार्च २०१६ नुसार तपासणी करुन घेऊन या कार्यालयास सादर केलेले आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील ई.बी.सी. पात्र धारक विद्यार्थ्यांना सबंधित योजनेचा लाभ मिळण्याचे दृष्टीने आपल्या स्तरावर ई.बी.सी. पात्र विद्यार्थ्यांचे निकाल तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे संकेतस्थळावर अद्यावत करणे बंधनकारक असुन अजुनपर्यंत सदर माहिती अद्ययावत केलेली नसल्याचे दिसुन येते.

तेव्हा याबाबत आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक वर्षापासून ते आजपर्यंत दोन्ही सत्रातील निकालाची माहिती (एसएससी नंतरच्या पदवीका अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असल्यास एस.एस.सी. परीक्षेचे गुण व एच.एस.सी. नंतरच्या पदवीका/पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असल्यास एस.एस.सी व एच.एस.सी परीक्षेचे ते सध्या शिकत असलेल्या वर्गापर्यंतचे गुण टाकणे आवश्यक आहे. ) अद्यापपर्यंत भरलेली दिसुन येत नाही त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता ई.बी.सी. योजनेच्या वाटपाकरीता या कार्यालयास प्राप्त झालेल्या निधीचे आपणास वाटप करता आलेले नाही.

तेव्हा आपणास पुनश्च: कळविण्यात येते की, आपण दिनांक ११/११/२०१६ पर्यंत सदर ईबीसी लॉगीनमध्ये संपुर्ण निकालाची (दोन्ही सत्राची) माहिती भरावी व माहीती भरुन झाल्यानंतर आपल्या संस्थेमध्ये सबंधित काम हाताळणा-या व्यक्तीस या कार्यालयामध्ये सर्व निकालाचे दस्तऐवज घेऊन प्रत्यक्ष हजर राहुन या कार्यालयाचे लॉगीनमधुन अप्रुव्ह करुन घेण्यास वरील दिनांकाचे आत करुन घेण्यास कळवावे.

तसेच याबाबत आपणास कळविण्यात येते की, दिलेल्या दिनांकापर्यंत निकालाबाबतची माहीती ई.बी.सी. लॉगीन मध्ये न भरल्यास किंवा ई.बी.सी. प्रतिपुर्तीकरीता प्राप्त झालेला निधी परत गेल्यास व त्यामुळे विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संस्थेचीं राहील, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,

अमरावती.

**प्रत :-** १. मा.संचालक, (कार्यासन क्रमांक १५) तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहीतीकरीता सादर.

२. प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

F:\backup kadam\all Manish letter 30 B.doc

1595